जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 MAR 2020
तरुण भारत

# वारणा बझार अनुभवी संस्था

## माजी आरोग्य अधिकारी डॉ. शिवाजीराव भोई यांचे प्रतिपादन : विक्रेता प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन



वारणानगर : येथे विक्रेता प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना डॉ. शिवाजीराव भोई, सोबत डॉ. ए. एम. गुरव, सुभाष देसाई, शरद महाजन, विजय केसरकर, राजाराम गुरव आदी मान्यवर.

प्रतिनिधी
वारणानगर

वारणा बझार ही ग्राहक चळवळीतील प्रचंड मोठी अनुभव असलेली संस्था असून या संस्थेचे देशपातळीवर आदराने नाव घेतले जाते. ग्रामीण पातळीवरील वारणेचे काम हे आदर्शवत आहे. सहकारमहर्षी तात्यासाहेबांनी चांगली माणसे गोळा करून वारणा परिसराचे नंदनवन केले आहे सहकार चळवळीतील मानदंड म्हणून आज वारणेकडे पाहिले जाते. विक्रेत्याने विक्री कौशल्य आत्मसात करून घ्यावे. सतत सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असे प्रतिपादन माजी आरोग्य अधिकारी डॉ. शिवाजीराव भोई यांनी येथे बोलताना केले.

वारणानगर (ता. पन्हाळा) येथील वारणा बझार व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या मान्यतेने राबविण्यात येणाऱ्या विलासराव तात्यासो कोरे कंझ्युमर्स को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग सेंटरच्या २५ व्या बॅचचे उद्घाटन समारंभात डॉ. भोई बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कॉमर्स विभाग व स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे डीन डॉ. ए. एम. गुरव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वारणा बझारचे सरव्यवस्थापक शरद महाजन यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, आज वारणा समूहाचे प्रमुख आमदार डॉ.विनय कोरे व संस्थेच्या अध्यक्षा शोभाताई कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली बझारने नेत्रदीपक प्रगती साधली आहे.

यावेळी डॉ.ए.एम.गुरव यांनी स्वतःला घडविण्याकरीता विद्यार्थी युवकांनी मार्केटिंगचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल अंगी जिद्द,कठोर परिश्रम घ्यायला पाहिजे असा सल्ला दिला.

वारणा बझारमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मान्यतेने सुरू झालेल्या मा.विलासराव कोरे विक्रेता प्रशिक्षण वर्गात एकूण ६१ प्रशिक्षणार्थी विविध जिल्ह्यातून सहभागी झालें आहेत.

यावेळी बझारचे उपाध्यक्ष सुभाष देसाई, संचालक राजाराम गुरव संचालिका बबुताई महापुरे, सल्लागार विजय केसरकर, विक्रेता सेंटरचे प्रा. डी.एस. पवार प्रा. एस.व्ही. पोवार, प्रा.बी.व्ही. वळगड्डे, प्रा.पी.बी. बंडगर, प्रा.सी.आर. जाधव, प्रा.डी.एस. गुरव, शिवभक्त के.एन. पाटील वारणा दूध संघाचे संगणक विभागाचे डॉ.एन.ए. पाटील,बझारचे शिवाजी पाटील, दिलीप पाटील महेश आवटी, संदीप पाटील,तानाजी ढेरे, हणमंत दाभाडे आदी उपस्थित होते पी.बी. बंडगर यांनी सूत्रसंचालन केले तर शिवाजी पाटील यांनी आभार मानले.

# बोटॅनिकल गार्डन पर्यटकांना खुले

## विद्यापीठात दुर्मिळ वनस्पती पाहण्याची संधी मिळणार

कोल्हापूर टाइम्स टीम

कोल्हापूर : पश्चिम घाटातील लोप पावत चाललेल्या दुर्मिळ अशा शंभरहून अधिक प्रजाती, देशभरातील पामच्या ११० प्रजाती पाहण्याची संधी पर्यटकांना शिवाजी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी विद्यापीठाचे बोटॅनिकल गार्डन या उपक्रमासाठी खुले करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या बॉटनी विभागाने तीन दशकांच्या परिश्रमातून बॉटॅनिकल गार्डनची उभारणी केली आहे. केंद्रीय मंत्रालयाने याला भारतीय लीड बॉटॅनिकल गार्डन म्हणून मान्यता दिल्याने हे ठिकाण जगाच्या नकाशावर आले आहे. १२०० हून अधिक वनस्पतीच्या प्रजाती गार्डनमध्ये असून, देशभरातील पामच्या ११० प्रजाती आहेत.

सध्या शाळा, महाविद्यालयांच्या सहली गार्डनमध्ये येत आहेत. विद्यार्थ्यांसाठी पाच तर शिक्षकांसाठी २५ रुपये आकारले जातात. या रकमेचा वापर बागेतील कर्मचारी आणि देखभालीसाठी वापरला जातो. देशभरातील पर्यटकांनी बागेला भेट द्यावी आणि विद्यापीठ जगाच्या नकाशावर यावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने संकल्प आखला आहे. त्यासाठी विभागप्रमुख वर्षा जाधव-राठोड आणि ज्येष्ठ संशोधक पी. डी राऊत यांनी गार्डनची माहिती वेबसाइटवर अपलोड करण्यासाठी व्हिडिओ तयार केला आहे. स्वतंत्र वेबसाइट करण्यात येत आहे. महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत गार्डन खुले राहणार आहे. पर्यटकांसाठी ५० रुपये फी आकारण्यात येणार आहे.

हे गार्डन ४५ एकरात असून, पश्चिम घाटात दुर्मिळ, लोप पावत चाललेल्या शंभरहून अधिक प्रजाती पाहायला मिळतील. पर्यटकांबरोबर देशभरातील अभ्यासक, विद्यार्थी या बागेला भेट देतील, असा विश्वास विभागप्रमुख जाधव राठोड यांनी व्यक्त केला.






**बोटॅनिकल गार्डनमधील वनस्पतींची नावे**

पामच्या ११० प्रजाती, व्हिक्टोरिया ॲमेझिनिक, सेंच्युरी पाम, उंडी, नरक्या, नोनी, सुंदरी, मयूर शिरवा, पचोली, गुलाबी मिरी.

> पश्चिम घाटातील दुर्मिळ वनस्पती नष्ट होत असून, त्याचे संगोपन बोटॅनिकल गार्डनमध्ये केले आहे. केंद्राने लीड गार्डन म्हणून मान्यता दिली आहे. बागेतील दुर्मिळ वनस्पती देशभरातील पर्यटकांना पाहता याव्यात यासाठी महिन्याच्या पहिल्या रविवारी गार्डन खुले करून देण्यात येणार आहे.
>
> – देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पृथ्वी रक्षण

# 'राजारामबापूं'वर शनिवारी चर्चासत्र

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट मार्फत'राजारामबापू पाटील आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळ'या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहात शनिवार दिनांक ७ मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजता होणाऱ्या या चर्चासत्राचे उदघाटन अमेरिकेतील जेम्स मॅडिसन युनिव्हर्सिटीतील महात्मा गांधी सेंटर फॉर ग्लोबल नॉन-वॉयलेंसचे संचालक डॉ. टेरी बेटझील यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असणार आहेत.



चर्चासत्रामध्ये राजारामबापू पाटील यांच्या सहकार क्षेत्रातील योगदानावर चर्चा करण्यात येणार आहे.

राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक,राजकीय व सहकार क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला होता. सहकार, शिक्षण, कृषी-औद्योगीकरण व ग्रामीण विकास या क्षेत्रामध्ये त्यांची कामगिरी उल्लेखनीय होती. राजारामबापू पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सदरच्या चर्चासत्राचे आयोजन केले असून सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्र-संचालक डॉ. प्रकाश पवार व कार्यक्रमाचे समन्वयक गजानन साळुंखे यांनी केले आहे.



डॉ. एन. एल. तरवाळ यांना प्रमाणपत्र प्रदान करताना डॉ. जी. डी. यादव. डॉ. पी. एस. पवार

# डॉ. तरवाळ यंग असोसिएट फेलोपदी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ.एन. एल. तरवाळ यांची महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसतर्फे यंग असोसिएट फेलो म्हणून निवड करण्यात आली. निवडीचे प्रमाणपत्र ॲकॅडेमीचे चेअरमन प्रा. डॉ. जी.डी. यादव, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी डॉ. बी. बी काळे, प्रा. डॉ. पी. पी. वडगावकर, विद्यापीठाच्या सायन्स आणि टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील आदी उपस्थित होते. डॉ. तरवाळ यांनी आजपर्यंत ६५ आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 MAR 2020

Times of India

# SUK's prospective plan meeting for new colleges, subjects tomorrow

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK), has asked its affiliated colleges and stakeholders to attend the meetings called to discuss requirements of new colleges, additional divisions and subjects for the 2021-22 academic year.

The meetings will be conducted across Sangli, Satara, and Kolhapur districts from March 6. An advertisement, undersigned by the SUK registrar Vilas Nandavadekar and published on March 4, said that in order to find out academic requirement of courses, colleges, or the division, a discussion with the stakeholders is scheduled on March 6 at New College in Kolhapur and on March 9 in Satara and Sangli.

"Interested parties can send proposals to set up colleges in these areas. We are also open to organisations in other areas interested in setting up colleges. They can contact the meeting coordinators to submit their proposals according to the pre-requisite guidelines of five-year master plan," it said.

File Photo



The meetings will be conducted across Sangli, Satara and Kolhapur districts on March 6 and 9

A SUK official said the university has to send their academic proposals based on their requirement for each year via the said perspective plan. A five-year master plan has already been submitted to the higher education department.

"There is a possibility of starting more subjects than colleges in the next perspective plan proposal. There are already many colleges across the division offering new subjects and courses now remain the main focus."

**A SUK official said the university has to send their academic proposals based on their requirement for each year via the said perspective plan. A five-year master plan has already been submitted to the higher education department**

Before drafting the final proposal for submission to the state government, the SUK officials will record all the suggestions they receive in the aforesaid meetings.

According to the university official, the employability of students and starting skill-based courses is one of the major focuses in the perspective plan.

# शिवाजी विद्यापीठ शैक्षणिक वार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी स्वीकारावयाच्या प्रस्तावांचा वार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. त्या अनुषंगाने कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यात कोणत्या ठिकाणी नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आवश्यकता आहे, हे निश्चित करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातील व समाजातील विविध घटकांच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा करून व त्यांची मते, माहिती घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील तीन जिल्ह्यांमध्ये बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता न्यू कॉलेज येथे कोल्हापूर जिल्ह्याची बैठक होईल. ९ मार्च रोजी सातारा येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड व सांगली जिल्ह्यातील एस. डी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, उरण इस्लामपूर या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.



कोल्हापूर : नाईट कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना डॉ. पी. टी. गायकवाड. शेजारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, ॲड. व्ही. एन. पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे.

# ऑलिम्पिक जिंकण्याचे ध्येय बाळगा : डॉ. पी. टी. गायकवाड

कोल्हापूर : महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी कला, क्रीडाच्या माध्यमातून स्वतःच्या क्षमतांचा, प्रतिभेचा आविष्कार करावा. प्रत्येकाने जिंकण्याची जिद्द बाळगावी. खेळाडूंनी ऑलिम्पिक जिंकण्याचे ध्येय बाळगावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. ते नाईट कॉलेज ऑफ आर्टस्‌ ॲण्ड कॉमर्स येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव ॲड. व्ही. एन. पाटील होते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे, डॉ. अरुण शिंदे, डॉ. सुनील सूर्यवंशी उपस्थित होते.

# वारणा बझारमध्ये विक्रेता प्रशिक्षण वर्ग

वारणानगर, ता. ४ : सहकारमहर्षी तात्यासाहेबांनी चांगली माणसे गोळा करून वारणा परिसराचे नंदनवन केले आहे. विक्रेत्याने विक्री कौशल्य आत्मसात करून घ्यावे. सतत सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असे मत माजी आरोग्य अधिकारी डॉ. शिवाजी भोई यांनी व्यक्त केले.

येथील वारणा बझार व शिवाजी विद्यापीठाच्या मान्यतेने विलासराव तात्यासो कोरे कंझ्युमर्स को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग सेंटरच्या २५ व्या बॅचच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. विद्यापीठाचे कॉमर्स विभाग व स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे डीन डॉ.ए.एम.गुरव प्रमुख उपस्थित होते.



वारणानगर : येथील वारणा बझारमध्ये विलासराव कोरे विक्रेता प्रशिक्षण वर्गाच्या २५ व्या बॅचच्या उद्घाटन समारंभात बोलताना माजी आरोग्य अधिकारी डॉ. शिवाजी भोई. शेजारी डॉ.ए. एम. गुरव, सुभाष देसाई, शरद महाजन, विजय केसरकर, राजाराम गुरव आदी.

वारणा बझारचे सरव्यवस्थापक शरद महाजन यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ. गुरव यांनी स्वतःला घडविण्याकरीता विद्यार्थी, युवकांनी मार्केटिंगचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल अंगी जिद्द,कठोर परिश्रम घ्यायला पाहीजे असा सल्ला दिला. एकूण ६१ प्रशिक्षणार्थी विविध जिल्ह्यातून सहभागी झाले आहेत.

यावेळी बझारचे उपाध्यक्ष सुभाष देसाई, संचालक राजाराम गुरव संचालिका बबुताई महापुरे, सल्लागार विजय केसरकर, विक्रेता सेंटरचे प्रा. डी. एस. पवार, प्रा. एस. व्ही. पोवार, प्रा. बी. व्ही. वळगड्डे, प्रा.पी. बी. बंडगर, प्रा. सी. आर. जाधव, प्रा. डी. एस. गुरव, शिवभक्त के. एन. पाटील वारणा दूध संघाचे संगणक विभागाचे डॉ. एन. ए. पाटील, बझारचे शिवाजी पाटील, दिलीप पाटील महेश आवटी, संदीप पाटील, तानाजी डेरे, हणमंत दाभाडे आदी उपस्थित होते पी. बी. बंडगर यांनी सूत्रसंचालन केले. शिवाजी पाटील यांनी आभार मानले.